CNR No. MHRG120000332016

नियमीत दिवाणी दावा क्र. २६/२०१६
महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळ तर्फे
दिनेश कांबळे वि. मनोज मोरे

## निशाणी क्र.७३ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने जिल्हाधिकारी रायगड यांचा आदेश आणि मंडळ अधिकारी यांनी तयार केलेली ताबेपावती यांच्या पडताळणी केलेल्या प्रतींना निशाणी देण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे दाखल करुन वादीचा सरतपास पुर्ण झाल्यानंतर उलटतपासादरम्यान सदर कागदपत्रे अभिलेखावर दाखल करण्यात आले आहे. त्यामुळे खर्चासह प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी मागणी केली आहे.

२. वादीतर्फे विद्वान वकील श्री. एस. पी. सानप आणि प्रतिवादी विद्वान वकील श्रीमती एम. एस. बाने यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत अर्जामध्ये मुळ प्रती अभिलेखावर आणल्या नाहीत ही बाबा नमूद करण्यात आली नाही. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तूतचा अर्ज दाखल केल्यानंतर दिनांक १५/०७/२०२३ रोजी वादीने निशाणी क्र. ७६ कडील अर्जासह उपरोक्त कागदपत्राच्या मुळ प्रती दाखल केल्या आहेत. त्यामुळे प्रस्तूतच्या पडताळणी केलेल्या प्रतींना निशाणी देवून पुराव्यात वाचणे योग्य होणार नाही. करिता मी खालील आदेश पारित करतो -

## आदेश

१. अर्ज फेटाळण्यात येतो.
२. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE
Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.08.05 18:46:04 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : ०५/०८/२०२३

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड